# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES

**Approved by : University Grant Commission (UGC)**

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

**Vol. IV, Special Issue -II, January, 2019 ISSN (Online): 2454-8499**

Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)




INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS


Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade


Scanned with CamScanner

# International Research Journal of Multidisciplinary Studies

Chief Editor
Dr. Mahendra R. Avaghade

Executive Editor
Prof. Tanaji D. Jadhav

Published by
**IJRMS**
Sr. No. 397, Flat No. 7, 4 Sizan Society,
Bhugaon, Tal. Mulshi, Dist. Pune 412115

**Printed by**
**Anmol Graphics**
Flat No.3, Ojas Apartment
Sr.No.57/3B, NR, Morya Vihar, Kothrud, Pune 411038

Copyrights: Editors @2019
All Rights reserved

ISSN: 2454-8499 (Online)

Issue
Available at www.irjms.in

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २४) | महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका : एक अभ्यास | डॉ.तळेकर चंद्रशेखर |
| २५) | महाराष्ट्राच्या राजकाराणातील बदलते नेतृत्व | डॉ. सुनिल पिंपळे |
| २६) | महाराष्ट्रातील मानवी स्थलांतर आणि विकासाचा प्रश्न | प्रा. डॉ.मोहन चौगुले |
| २७) | महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलती समीकरणे | डॉ. रामकिशन लोमटे |
| २८) | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : मा. शरद पवार | डॉ. बाळ कांबळे, प्रा. प्रदीप जगताप |
| २९) | महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास : वास्तवता | डॉ. संजय भोळे, डॉ. के. जी. पोकळे |
| ३०) | भाषावार प्रांतरचना आणि महाराष्ट्र : संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा विशेष संदर्भ | स्वप्निल बोधने |
| ३१) | महाराष्ट्रातील राजकीय संस्कृतीचे बदलते स्वरूप | डॉ. राजकुमार सुरवसे |
| ३२) | महाराष्ट्राच्या राजकारणातील समस्या | प्रा. जे. जी. गायकवाड |
| ३३) | महाराष्ट्राचे राजकारण आणि जात | डॉ संभाजी वारूंगळे पाटील |
| ३४) | महाराष्ट्राचे राजकारण : काँग्रेस वर्चस्व ते बहुपक्षीय स्पर्धा | प्रा. ऋतुराज बुवा |
| ३५) | महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष व जातींचा राजकारणातील प्रभाव | प्रा. डॉ. व्ही. एच. भटकर |
| ३६) | स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील दलित नेतृत्वाचा राजकीय व्यवहार | प्रा. किर्तीकर भीमराव |
| ३७) | महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील बदलते नेतृत्व | शेख जब्बार खलील |
| ३८) | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण | प्रा. कांतीलाल सोनवणे |
| ३९) | महाराष्ट्रातील स्थानिक राजकीय प्रक्रिया | डॉ. संतोष कायंदे |
| ४०) | आधुनिक महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राच्या विकासात यशवंतराव चव्हाणांची भूमिका | डॉ. कलिदास फड |
| ४१) | महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी घटक | प्रा.जयश्री शेंडे |
| ४२) | महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ | डॉ. आर.के. काळे |
| ४३) | शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे स्त्री-स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ |
| ४४) | महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळ : एक अवलोकन | प्रा. किरण गायकवाड |
| ४५) | रोहिंग्या मुस्लिमांचा प्रश्न आणि भारताची भूमिका | दत्तात्रय जाधव |
| ४६) | मराठा आरक्षण | डॉ. मंजिरी कारेकर |
| ४७) | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ | डॉ. हनुमंत फाटक, प्रा.अविनाश सावळकर |
| ४८) | महाराष्ट्रातील विडी कामगार चळवळी समोरील पेचप्रसंग | प्रा. राजू पांडे |
| ४९) | महिलांच्या समस्या आणि वाद | डॉ. दिनकर कळंबे |
| ५०) | महिलांचे मानवी हक्क : एक ऋजुतापूर्वक न्याय | डॉ. सुवर्णा गुडगे-बेनके |
| ५१) | भारतीय राजकारणात स्त्रीयांची भूमिका व योगदान विशेष संदर्भ :- महाराष्ट्र राज्य | डॉ.कदम हरिभाऊ |
| ५२) | पंचायतराज व्यवस्थेत महिला नेतृत्वाचा सहभाग | डॉ. विलास आघाव |
| ५३) | मंदिर प्रवेश - स्त्री हक्क | प्रा.डॉ.मनिषा कचवे |
| ५४) | महिला सबलीकरणात महाराट्राची भूमिका | डॉ. प्रभाकर जगताप |
| ५५) | मानवी जीवनातील शिक्षणाचे महत्त्व | डॉ. संजय लांडगे |


Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
Vol. IV, Special Issue -II, January, 2019 ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

28

# आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : मा. शरद पवार

डॉ. बाळ कांबळे (प्राचार्य)
प्रा. प्रदीप जगताप (प्राध्यापक)
रयत शिक्षण संस्थेचे, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्य हे आज अनेक क्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य आहे. देशात आज महाराष्ट्राला हे स्थान मिळवून देण्यात अनेकांचा सहभाग आहे. राजकारणी, समाजसुधारक, वैज्ञानिक, साहित्यीक, खेळाडू, अभ्यासक इत्यादींनी महाराष्ट्र घडवण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यामध्ये मा. शरद पवार यांचे नाव अग्रभागी आहे. महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रात पुढे नेण्यात मा. शरद पवार यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे निर्णय, धोरणे, व्यक्तिमत्त्व, भूमिका इत्यादी बाबींचा महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक जडणघडणीवर परिणाम झाला आहे.

कृषी, ग्रामीण विकास, महिला सबलीकरण, युवक कल्याण, क्रीडा विकास, आपत्ती व्यवस्थापन, शैक्षणिक विकास, औद्योगिक विकास यामध्ये त्यांचे अतुलनीय योगदान आहे. म्हणूनच ते आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत.

महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे. शेती व्यवसायाला कधी नैसर्गिक तर कधी मानवी संकटांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदतीची आवश्यकता असते. मा. शरद पवार हे मूळचे शेतकरी आहेत. त्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांचे मर्म अचूक ओळखून कृषिक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना योग्य उत्पन्न मिळावे यासाठी त्यांनी १९९० मध्ये मुख्यमंत्री असताना फलोत्पादन कार्यक्रम हा रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला. यामुळे महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतकरी, दलित व आदिवासीसारख्या दुर्बल घटकातील शेतकऱ्यांनाही फळबागांची लागवड करणे शक्य झाले. तसेच राज्यातील हजारो हेक्टर पडीक व नापिक जमीन त्यांच्या या निर्णयामुळे लागवडीखाली आली. फलोत्पादन विकासामध्ये मा. शरद पवारांनी फळे, भाजीपाला, फुले व मसाल्याच्या पदार्थांचा समावेश केला. फळे व भाजीपाला वाढीत सकस आहाराची गरज भागविण्याची व राज्याच्या ग्रामीण भागात सर्व दूर रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता निर्माण झाली. फलोत्पादन, साठवणूक, वाहतूक प्रक्रिया व पणन यांची सूत्रबध्द व्यवस्था निर्माण झाल्याने फळांना व भाजीपाल्यास नागरी बाजारपेठ मिळाली. इतकेच नव्हे तर परदेशी बाजारपेठही उपलब्ध होवू लागली आहे. नियमित प्राप्ती, उत्पन्नाचा शाश्वत मार्ग तयार होणे आणि वर्षभर रोजगार निर्माण करणे शक्य झाले. मा.शरद पवारांच्या या निर्णयामुळे व घेतलेल्या निर्णयाच्या काटेकोर अंमलबजावणीमुळे महाराष्ट्र हे देशात फलोत्पादनाच्या क्षेत्रात पहिल्या नंबरचे राज्य बनले.

महाराष्ट्रातील फलोत्पादन कार्यक्रम यशस्वी व्हायचा असेल, या कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना त्यांचे कष्टाचे दोन पैसे सुखाने मिळवावयाचे असेल तर फळझाड पिकांच्या पिकवार संघटना प्रथम स्थापन केल्या पाहिजेत हा विचार मा.शरद पवारांनी केला. त्याची कार्यवाही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण मार्फत करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे व प्रयत्नामुळे महाराष्ट्र राज्य बोर उत्पादक संघ, महाराष्ट्र राज्य डाळींब उत्पादक संघ, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ, महाराष्ट्र राज्य केळी उत्पादक संघ, महाराष्ट्र राज्य संत्रा उत्पादक संघ, महाराष्ट्र राज्य चिकू उत्पादक संघ अशा पीकवार संघटना स्थापन झाल्या.

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ ही देशाला अभिमान अशी द्राक्ष पिकाची संघटना स्थापन करण्यात व जग पातळीवर तिला प्रतिष्ठा मिळवून देण्यात मा.शरद पवारांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्रातील द्राक्ष बागायतदारांना गुणवत्तेची व अधिक उत्पादन क्षमतेची द्राक्षे निर्माण करण्याचे आधुनिक शिक्षण व तंत्रज्ञान या संघाने दिले. त्यामुळे महाराष्ट्रातील द्राक्ष बागायतदारांनी द्राक्ष उत्पादनात मोठी आघाडी मिळवली व अनेक जागतिक उच्चांक निर्माण केले आहेत. तसेच त्यांनी उच्चप्रतीची द्राक्षे उत्पादन करून जागतिक बाजारपेठ काबीज केलेली आहे. महाराष्ट्रातील हा अनुभव विचारात घेवून मा.शरद पवरांनी केंद्रात कृषीमंत्री झाल्यावर राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सुरु केले.

भारताची कृषी अर्थव्यवस्था बळकट होण्यासाठी भारतातील शेतकऱ्यांनी अन्नधान्यांच्या पारंपारिक पिकांना फळ, भाजीपाला, फुले उत्पादन, रेशीम उद्योग, दुग्धव्यवसाय,

Scanned with CamScanner

मत्स्यपालन, कुक्कुटपालन यासारख्या अन्य जोडधंद्याची जोड दिली पाहिजे, असे त्याचे मत आहे. मा.शरद पवार हे चौकस बुध्दीचे व चौफेर दृष्टीचे हाडाचे शेतकरी नेते असल्याने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कृषीशास्त्रज्ञ डॉ.एम.एस. स्वामीनाथन त्यांना हायटेक हॉर्टिकल्चरचे जनक म्हणतात.

मा.शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या व कल्याणाचा अनेक योजना राबवून कृषी विकासात बहुमूल्य योगदान दिले आहे. मध्ये केंद्र सरकारमध्ये कृषी मंत्री असताना त्यांनी कृषीक्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यामध्ये कोरडवाहू क्षेत्राचा विकास, सिंचन क्षेत्राची वाढ, पाण्याचे व्यवस्थापन, पिकाची उत्पादकता वाढविणे, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, शेतीमाल प्रक्रिया, दुग्ध व्यवसाय, कर्ज पुरवठा, कृषी पत पुरवठ्यावरील व्याजात कपात, शेती मालाला भाव मिळवून देणे हे अतिशय महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मा.शरद पवार यांनी शेतीच्या मालाला योग्य भाव मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे शेतकऱ्याना आर्थिक लाभ झाला. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी, कोटींची कर्जमाफी केली. शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडे जावू लागू नये म्हणून, कोटीपर्यत कर्जपूरवठा बँकांच्या माध्यमातून केला. एवढेच नाही तर या कर्जाच्या व्याजाचा दरही कमी केला. पिक कर्जाचा व्याजदर टक्के वरुन टक्के पर्यत खाली आणला. त्यामुळे शेतकऱ्यांना पिककर्ज परत करणे सोपे झाले. शेतकऱ्यांना विज्ञान तंत्रज्ञानाचा फायदा व्हावा व शेतीसंबंधी संशोधन होवून त्याचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा यासाठी कृषी विज्ञान केंद्राची संख्या वरून इतकी वाढविली.

मा.शरद पवार यांनी कृषीक्षेत्रातील विकासाबरोबरच श्वेतक्रांतीलाही हातभार लावला. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसायाकडे पाहिले जाते. या दुग्ध व्यवसायाला संजीवनी देण्याचे काम त्यांनी केले. दुग्ध व्यावसाय भरभराटीला यावा म्हणून आपल्या पारंपारिक पध्दतीपेक्षा आत्याधुनिक तंत्रज्ञानाची कास पवार साहेबांनी धरली आहे. आपल्याकडील गाई सरासरी चार लिटर दूध देतात तर ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड अशा पाश्चात्य देशातील गायी दहा पट अधिक म्हणजे लिटर दूध देतात. ही तफावत कमी करण्यासाठी त्यांनी नॅशनल डेअरी प्लॅनच्या माध्यमातून उच्च दर्जाचे ब्रिडींग स्टेशन्स उभारले, दुधाळ जनावरांची पैदास वाढवली. जनावरांची वैरण कमी पडू नये म्हणून वैरणीची व वैरणीची बियाणे पुरवण्याची व्यवस्था केली. त्याच्या या दूरदर्शी उपक्रमांमुळे दुग्धव्यवसाय हा किफायतशीर व्यवसाय ठरला आहे. तसेच क्लिन मिल्क योजना आणून दुधाची साठवण क्षमता व अधिक हायजेनिक रहावे यासाठी प्रयत्न केले. या एकाच योजनेत शेतकरी, दुधसंघ, ग्राहक या तिन्ही घटकाचे हित पाहिले गेले. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे देशातील जनता अप्रत्यक्षपणे आर्थिकदृष्ट्या बळकट झाली आहे.

मा. शरद पवार यांचे महिला सबलीकरणात महत्त्वाचे योगदान आहे. महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय विकास करण्यासाठी त्यांना पारंपारिक सामाजिक व्यवस्थेतून बाहेर काढून महिलांना चूल आणि मुल या मानसिकतेतून बाहेर आणले पाहिजे असे त्यांचे विचार आहेत. स्त्रियांच्या संदर्भातील अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा दूर व्हाव्यात, त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार दूर व्हावेत यासाठी ते आग्रही असतात. मा. शरद पवार हे पुरोगामी विचारांचे आहेत. त्यांच्या मते, महिलांना संधी मिळाली की त्या योग्य निर्णय घेतात, संयमपणे आणि जबाबदारीने परिस्थिती हाताळतात आणि कर्तृत्व गाजवतात. सर्वसाधारण महिला पारदर्शकपणे आणि व्यापक हिताचा विचार करुन निर्णय घेतात. त्याचबरोबर महिला आपल्या निर्णयाबाबत निश्चयी असतात. महिलांना त्यांचे कर्तृत्व सिध्द करण्यासाठी लागणारी अनुकुल परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची आहे, असे मा.शरद पवार यांचे मत आहे.

मा. शरद पवार यांनी सत्तास्थानी असताना महिला सबलीकरणाच्या संदर्भात पुढील महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यामध्ये राज्य महिला आयोगाची निर्मिती, राज्यसरकारमध्ये महिला व बालविकास खात्याची स्वतंत्र निर्मिती, लष्करी सेवेमध्ये महिलांना संधी, कौटुंबिक मालमत्तेवर पुरुषांप्रमाणेच महिलांना ही हक्क देणारा कायदा, स्त्रियांना एमपीएससी मध्ये टक्के आरक्षण, महिला धोरण, स्थानिक स्वराज संस्थामध्ये महिलांना टक्के आरक्षण याचा समावेश करता येईल. महिलांविषयीचा त्यांचा दृष्टीकोन हा घरातूनच तयार झाला आहे. त्यांच्यावर त्यांच्या मातोश्री शारदाबाईचे संस्कार आहेत.

मुलगा-मुलगी सारखेच मानून स्त्री-पुरूष समानतेचा नवा आदर्श मा.शरद पवारांनी स्वतःच्या कृतीतून घालून दिला. त्यांनी आपले कुटूंब केवळ एका मुलीच्या जन्मानंतर नियंत्रित केले व या देशात त्यांनी स्वतःच्या वागणुकीने कुटूंब नियंत्रणाच्या क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला. त्यांच्या या आधुनिक विचारांच्या महान कार्यात त्यांच्या पत्नी सौ.प्रतिभाताईनी फार मोठे सहकार्य केले. वंशाला मुलगाच असण्याची वाट न पाहता फक्त एकाच मुलीनंतर आपले कुटूंब मर्यादित करण्याची मा.

Scanned with CamScanner

शरद पवारांची कृती त्यांना महात्मा फुले यांचा वैचारिक वारसा घेणाऱ्यांच्या पंक्तीत बसविण्यारी अशीच आहे. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, पाणी पाजील, पिंडदान करील अशा भ्रामक व भंपक समजूती यांना बुध्दीप्रामाण्यवादी, विज्ञानवादी असणाऱ्या मा.शरद पवारांनी कधीच थारा व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात दिला नाही. महात्मा फुले, राजर्शी शाहू महाराज यांचे स्त्रीविशयक शिक्षणाच्या दृष्टीकोनासारखाच मा. शरद पवारांचा स्त्री शिक्षणाचा दृष्टीकोन असल्याने त्यांनी आपल्या मुलीला उच्च विद्याविभूषित करुन सुसंस्कारित केले. तिला स्वतःच्या आवडी नुसार करिअर करण्याची मोकळीक दिली. यावरुन मा. शरद पवार यांचे महिला सबलीकरणातील योगदान स्पष्ट होते.

महाराष्ट्राच्या पुरोगामी इतिहासात मा. शरद पवार यांचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवले जाईल. महात्मा फुले, राजर्षि शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर पुरोगामी विचार आपल्या कृतीने आचरणात आणणारे व ते राबविणारे मा. शरद पवार हे एकमेव नेते आहेत. मा. शरद पवार यांनी मराठवाडा विद्यापीठास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे नाव देवून त्यांनी ते सिध्द केले आहे. पुरोगामी विचार या महाराष्ट्रात रुजविण्यासाठी व या विचारांची अंमलबजावणी करण्यासाठी सत्तेची फार मोठी किंमत मोजण्यासाठी मा. शरद पवार यांनी मागेपुढे पाहिले नाही व यासाठी सत्तेची कोणतीही हाव धरली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रुपाने दलितांची अस्मिता जपण्यासाठी त्यांनी राज्य गमावले परंतु पुरोगामीत्वाचे कधीही पुसले न जाणारे नाव त्यांनी कमावले. लोकशाही समतेवर व समान न्यायावर आधारलेली घटना असूनही त्याप्रमाणे समाजाला पुढे नेण्याचा प्रयत्न असूनही या काळात जातिभेदाचे भेसूर परिणाम काही ठिकाणी आजही आपणास पाहावयास मिळतात. त्यामुळे सामाजिक समतेचे, सामाजिक न्यायाचे व जातिभेद निर्मूलनाचे कार्य हे आज ऐतिहासिक निकडीचे कार्य झाले आहे. या पार्श्वभूमिवर सामाजिक सुधारणा, समता, सामाजिक न्याय व जातिभेद निर्मूलनाच्या कार्याला वाहून घेतलेले मा. शरद पवार हे समाजात नवा विश्वास व सामाजिक एकतेची जाणीव निर्माण करतात.

देशाचा व महाराष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर पहिल्यांदा लोकसंख्येचा शेतीवरील बोजा कमी करणे गरजेचे आहे, असे मा. शरद पवारांचे मत आहे. शेतकरी नेता अशी मा. शरद पवारांची देशात व राज्यात प्रतिमा असली तरी त्यांनी डोळसपणे औद्योगिकरणाचा पुरस्कार केलेला आहे. महाराष्ट्रातील औद्योगीकरणात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्राचे पहिल्यांदा पु.ल.द. चे मुख्यमंत्री असताना त्यांनी महाराष्ट्रात उद्योग व्यवसायाचे चौफेर जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राज्यात उद्योग व्यवसायाचा विस्तार करण्याची भूमिका घेतली. महाराष्ट्रात उद्योग व्यवसायांचे फार मोठे केंद्रीकरण मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक या भागातच झाल्याचे शरद पवारांच्या लक्षात आल्याने त्यांनी उद्योग व्यवसायाचा विस्तार महाराष्ट्राच्या औद्योगिकदृष्टया मागासलेल्या भागात झाला पाहिजे, असा धोरणात्मक निर्णय घेतला. ग्रामीण भागातील जास्तीत जास्त तरुण मोठ्या संख्येने उद्योग व्यवसायात जाणेसाठी त्यांनी तालुका पातळीपर्यत औद्योगिक वसाहती निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. उद्योगांच्या विकेंद्रीकरणाचा कार्यक्रम त्यांनी यशस्वीपणे राबविला. महाराष्ट्रातल्या सर्व तालुक्यात औद्योगिक वसाहती निर्माण होण्यासाठी कारखानदारांना शासनाच्या अनेक सवलती दिल्या.

महाराष्ट्राच्या औद्योगीक विकासाचा व उद्योग व्यवसायाचा पाया मजबुत करण्यासाठी परदेशस्थ भारतीयांचा पैसा, तांत्रिकज्ञान, अनुभव व कौशल्याचा उपयोग मा. शरद पवार यांनी जाणीवपूर्वक करुन घेतला. त्यासाठी त्यांनी विविध देशांना भेटी देवून त्यांना राज्यात गुंतवणुक करुन उद्योग उभारण्यास सहकार्य केले. राज्यकारभाराच्या लालफितीमुळे होणारा विलंब व निर्माण होणाऱ्या हरकती टाळण्यासाठी मा.शरद पवार यांनी कारखानदारांना मदत करण्यासाठी सचिवालयात खास विभाग निर्माण केला. त्यांच्या या कार्यक्रम धोरणामुळे व निर्णयामुळे इंजिनिअरिंग, ॲटो, रसायने, पेट्रोकेमिकल्स, कृत्रिम धाग्याचे कापड, प्लॅस्टिक, रबर, साखर प्रक्रिया व शेतीमाल प्रक्रिया, अन्न पदार्थ, औषधे यात महाराष्ट्राने भरीव प्रगती केली. महाराष्ट्रांचा औद्योगिक विकास व्हावा यासाठी त्यांनी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था स्पर्धात्मक राहावी म्हणून निर्यात प्रधान उद्योगनिर्मितीची कल्पना मांडली. उत्पादन, निर्यात यात गुणात्मक वाढ करून आधुनिकीकरणासाठी पाऊल उचलणे आवष्यक आहे, हे त्यांचे मत आहे. इंधनाचा तुटवडा कमी करण्यासाठी गॅस, अल्कोहोल, कोळसा, बायोगॅस, ऊर्जा व वायु, समुद्र लाटावर वीजनिर्मिती यासारखे पर्यायी उपाय योजले जावेत असा त्यांचा आग्रह आहे. परदेशस्थ भारतीयांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी म्हणून त्यांनी विशेश प्रयत्न केले आहेत.

मा.शरद पवार यांना बालपणापासूनच कुस्ती, कब्बडी व खो–खो यासारख्या देशी खेळांची आवड आहे. माणसांचे

Scanned with CamScanner

जीवन समृध्द करण्यात खिलाडू वृत्तीचे व खेळांचे अनन्य महत्त्व असते ते त्यांनी अचूक ओळखले आहे. माणसाचे आरोग्य व मानसिक स्वास्थ्य कायम ठेवण्यास खेळाचे असणारे महत्त्व लक्षात घेवून मा. शरद पवारांनी महाराष्ट्रातील मल्लखांब, कुस्ती, कबड्डी व खो-खो सारख्या खेळांना मुख्यमंत्री झाल्यावर आधुनिक पध्दतीच्या सुविधा निर्माण करून दिल्या. या खेळांना प्रोत्साहन दिले. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात या खेळांचा प्रसार व्हावा व या खेळात उत्कृष्ट खेळाडू निर्माण व्हावेत म्हणून तालुकानिहाय या खेळांची शिबिरे व प्रशिक्षण केंद्र सुरू केले. कबड्डीच्या खेळाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून देण्यात मा.शरद पवारांचा सिंहाचा वाटा आहे. पुरूषाबरोबर महिलांनाही कबड्डीच्या खेळात प्रोत्साहन देण्याची कामगिरी मा.शरद पवारांनी पार पाडली आहे. मा.शरद पवारांना लहानपणापासून कुस्तीची आवड असल्याने व कुस्ती हे महाराष्ट्राच्या क्रीडासंस्कृतीचे वैभव असल्याने त्यांनी कुस्तीचे खेळाला नवी दिशा दिली. महाराष्ट्रात आधुनिक पध्दतीच्या कुस्तीचे तंत्र आणणेसाठी सुविधा निर्माण केल्या. ते महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिशदेचे अध्यक्ष झाले. लाल मातीच्या आखाडयाबरोबरच त्यांनी महाराष्ट्रातील कुस्ती आधुनिक पध्दतीच्या गादीवरील तंत्राच्या साहाय्याने ही कुस्ती जगात नेली.

राज्यातील सर्वश्रेष्ठ अशा महाराष्ट्र केसरी पदाच्या कुस्ती स्पर्धेस मोठे उत्तेजन दिले. कुस्तीस लोकाश्रयाबरोबरच राजाश्रय मिळवून दिला. महाराष्ट्रात क्रीडा व युवक सेवा या संचालनालयाची स्वतंत्रपणे मा.शरद पवार यांनी प्रथम स्थापना केली व राज्यातील क्रीडाक्षेत्राला त्यांनी नवी दिशा दिली. राज्यातील क्रीडाक्षेत्रात आधुनिकतेची जोड असलेली दिशा द्यायची असेल तर राज्यात आधुनिक सोयींनी परिपूर्ण अशी क्रिडांगणे होण्याची गरज लक्षात घेवून मा.शरद पवार यांनी राज्यात आधुनिक अद्ययावत क्रिडांगणे उभारण्यास सुरूवात केली. १९८८ मध्ये पुणे शहराजवळील बालेवाडी येथे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रीडासंकुल उभारण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

मा.शरद पवार यांना कबड्डी, खो-खो व कुस्ती या देशी खेळाबरोबरच क्रिकेट या खेळाविशयीही आपुलकी आहे. शरद पवार यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष झाल्यावर क्रिकेटच्या प्रसारासाठी विशेश लक्ष केंद्रित केले. भारतात क्रिकेट हा खेळ सर्व देशभर व जगात अत्यंत लोकप्रिय असल्याने त्याचा प्रसार देशातील जिल्हा व तालुका पातळीवर व्हावा व आतापर्यंत दुर्लक्षित असलेल्या या भागातून अनेक नवे जिद्दीचे तरूण क्रिकेटपटू निर्माण व्हावेत म्हणून त्यांनी खास योजना आखल्या. क्रिकेटचे हे देशपातळीवरील मंडळ अतिश्रीमंत आहे. या मंडळाने क्रिकेटबरोबर देशातील इतर खेळाकडेही लक्ष द्यावे असा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतला. तसेच क्रिकेट नियामक मंडळाकडून देशातील इतर खेळांच्या विकासासाठी व वाढीसाठी जवळ-जवळ शंभर कोटी रूपयांची आर्थिक तरतूद करण्यासाठी महत्त्वाकांक्षी निर्णय त्यांनी घेतला. त्यामुळे खेळांना व खेळाडूंना प्रोत्साहन मिळून क्रीडा क्षेत्रास झळाली आली आहे.

महात्मा ज्योतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षि शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणक्षेत्रातील विचारांचा व कार्याचा पगडा मा.शरद पवार यांच्यावर आहे. महाराष्ट्रात शासनाबरोबरच अनेक शिक्षणसंस्थाच्या शिक्षणक्षेत्रात काम करून मोलाचे योगदान त्यांनी दिले आहे. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद असून कमवा व शिका असा संदेश देणाऱ्या रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कर्मवीरांच्या जातिनिरपेक्ष सहजीवन, सहभोजन, सहशिक्षण व स्वावलंबन अशा या शैक्षणिक कार्याने भारलेल्या रयत शिक्षण संस्थेला भरभराटीला आणण्याचे काम मा.शरद पवार यांनी केले. कर्मवीर आण्णाप्रमाणेच शिक्षणाचा प्रसार व शिक्षणाचे फायदे समाजातील शेवटच्या थरातील घटकापर्यंत पोहचले पाहिजेत यासाठी ते मोठ्या तळमळीने या क्षेत्रात व संस्थेत कार्यरत आहेत. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, मुलींचे शिक्षण, ग्रामीण भागातील, डोंगरी भागातील, आदिवासी वनक्षेत्रातील उपेक्षित समाजातील आणि शिक्षणापासून वंचित झालेल्या मुला-मुलींना ज्ञानाच्या या प्रवाहात आणण्यासाठी ते आग्रही असतात. व्यावसायिक शिक्षण, शिक्षणाचे जागतिकीकरण, संगणक-इंटरनेट आणि जैविक तंत्रज्ञान या बदलत्या काळाशी सुसंगत अशा आधुनिक शिक्षणाचा अंगिकार करून ज्ञानसंपन्न पिढी होवून सर्व सामान्यांचे जीवन समृध्द करण्याचा आटापिटा ते नेहमी आपल्या कृतीने करतात. शिक्षणाच्या विस्ताराबरोबरच गुणवत्ता वाढीची खबरदारी ते घेत असतात.

जागतिकीकरणाच्या स्पर्धेच्या या युगात आपला विद्यार्थी टिकला पाहिजे यासाठी शासनाच्या प्रयत्नाबरोबरच रयत शिक्षण संस्था, विद्या प्रतिष्ठान बारामती, मातोश्री शारदाबाई पवार स्त्री-शिक्षण संस्था यांचे माध्यमातून सामान्यातल्या सामान्य विद्यार्थ्यास संगणक, तंत्रज्ञान, विज्ञान इ. आधुनिक व दर्जेदार शिक्षण देण्याचा ते आटोकाट प्रयत्न करित आहेत. स्वत:ची गुणवत्ता, ज्ञान व कष्ट करण्याची तयारी या गोष्टी तुमच्याकडे

Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
Vol. IV, Special Issue -II, January, 2019 ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

असतील तर तुम्ही कोठेही जावू शकता हा विष्वास ते युवकामध्ये निर्माण करतात.

आपत्काली संकटात सापडलेल्या माणसास मदत करणे हा शरद पवारांचा नेहमीचाच स्वभावधर्म आहे. ज्या ज्या वेळी या राज्यात व देशात सर्वसामान्य माणूस अडचणीत सापडला त्या त्या वेळी संकटात सापडलेल्या त्या माणसास मदत करण्यासाठी शरद पवार सर्वप्रथम धावून जाण्याचा अनेक घटना राज्यात व देशात घडल्या आहेत. संकट ते मानवनिर्मित असो अगर निसर्गनिर्मित असो, निर्माण झालेल्या संकटातून माणसाला सुरक्षितपणे बाहेर काढणे, त्याचे विस्कटलेले जीवन पूर्वपदावर आणण्यासाठी अविश्रांत कष्ट घेणे, परिस्थितीला योग्य असे निर्णय घेणे व घेतलेल्या निर्णयांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे हे मा.शरद पवारांच्या स्वभावधर्माची खासियत आहे. अयोध्येतील बाबरी मशिद पाडण्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईत डिसेंबर १९९२ मध्ये भीशण जातीय दंगली झाल्या. चार-पाच दिवस मुंबई शहर जळत होते. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या या शहरातील सर्व आर्थिक व्यवहार ठप्प झाले होते. माणुसकीला काळीमा फासणारी ही जातीय दंगल आटोक्यात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मा.शरद पवार यांनी केले. त्यासाठी त्यांना केंद्रातून मंत्रिपद सोडून राज्याचे मुख्यमंत्री करण्यात आले.

मा.शरद पवार यांनी लातूर जिल्हयात किल्लारी येथे झालेल्या भूकपाच्या वेळीही अत्यंत महत्त्वाचे काम करून तेथील जनजीवन पूर्वपदावर आणण्याचे काम केले. भूकपांच्या तडाख्यात सापडलेल्या लोकांना मदत करण्यासाठी शासकीय यंत्रणा त्वरीत सज्ञ करून फक्त तीन तासाच्या आत ते लातूरला हजर झाले होते. त्यांनी भूकंपग्रस्त भागाची पाहणी करून लोकांना धीर दिला. शासकीय यंत्रणेबरोबरच आपले सहकारी मित्र, सेवाभावी संस्था यांचेशी संपर्क साधून भुकंपग्रस्तांचे पूनर्वसन करताना त्यांना अन्न, पाणी, निवारा, वस्त्र, औशधे यांची मदत केली. त्याचबरोबर त्यांचे पूनर्वसनही करण्यात त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

लातूरच्या भूकंपानंतर शरद पवारांनी ज्या क्षमतेने, कल्पकतेने व मोठ्या मेहनतीने पूर्नवसनाचे काम करून दाखवले त्याचे जगात कौतुक झाले. त्या कामाची पावती म्हणून मार्च मध्ये त्या काळातील अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रशासनाने मा.शरद पवार यांची केंद्रिय आपत्कालीन व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली. गुजरातच्या विनाशकाली भूकंपानंतर केंद्रशासनाने ही समिती स्थापन केली होती. यातून त्यांच्या कार्यकुशलतेवर व क्षमतेवर दाखविलेला संबंध देशाचा विष्वास स्पष्ट होतो.

थोडक्यात, पुरोगामी राजकीय व सामाजिक विचारांचे खंदे पुरस्कर्ते, सामाजिक न्यायाचे उद्गाते, मंत्री, मुख्यमंत्री, भारताचे संरक्षणमंत्री, लोकसभेतील विरोधी पक्षनेते व भारताचे कृषीमंत्री हया विविध पदावर मा.शरद पवार यांनी आपले कर्तृत्व सिध्द करून महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सामाजिक समतेचा व सामाजिक न्यायाचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणून समाज परिवर्तनाच्या विचारास आधुनिक महाराष्ट्रात गती दिली आहे. शरद पवार यांनी शेतकरी, महिला, कामगार, मागासवर्गीय यांना न्याय मिळवून देण्यासाठी अहर्निश प्रयत्न केले आहेत. संयमशील नेतृत्व, प्रखर कार्यनिष्ठा, कष्टाची तयारी, विधायक वृत्ती, पुरोगामी विचार, जनसेवेची आंतरिक तळमळ, कृतिशील नेतृत्व यांच्या सुंदर मिलाफातून मा.शरद पवारांनी महाराष्ट्राची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, क्रीडाक्षेत्रात प्रगती केली आहे. म्हणून त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणणे यथायोग्य वाटते.

संदर्भ :

१. कांडगे राम, 'लोकनेते शरद पवार', राजश्री प्रकाशन, चाकण, पुणे.

२. पवार शरद, 'लोक माझे सांगती, राजकीय आत्मकथा', राजहंस प्रकाशन, पुणे.

३. चव्हाण विद्या, 'शरद पवार, महासागर एक दृष्टीक्षेप', मुंबई.

४. शाह शरद, 'राष्ट्रवादी शरद पवार', रेखा प्रकाशन, मुंबई.

५. पवार शरद, 'उद्याचा महाराष्ट्र : अपेक्षा, आव्हाने', अमेय प्रकाशन, पुणे.

६. भोसले अच्युत व सोनवणे सुधाकर, 'शरद पवार -माणूस म्हणून भावलेले', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.

७. पाटील अशोक, 'शेतकऱ्यांचे शरद पवार', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

८. शेवते अरूण, 'आम्ही पाहिलेले शरद पवार', ऋतुरंग प्रकाशन, मुंबई.

९.टिळेकर अरूण, 'स्पर्धा काळाशी', रोहन प्रकाशन, पुणे.

१०.पवार शरद, 'दुसरी हरितक्रांती', अमेय प्रकाशन, पुणे.११. मेहेंदळे विष्वास, 'यशवंतराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाण', अनुबंध प्रकाशन, पुणे.

१२.पाटील जयंत, 'भूमीपूत्रांचा आधार -शरद पवार', वैभव प्रकाशन, इस्लामपूर.

Scanned with CamScanner